**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विशेष परीक्षेसाठी ४०० चे वर विद्यार्थ्यांची नोंदणी

## नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात परीक्षा

**अमरावती -**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने उन्हाळी - २०२० परीक्षांचे संचालन दि. २६ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले होते. या कालावधीत संचालित झालेल्या परीक्षेकरिता विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे सादर केली, पण काही विद्यार्थी अपरिहार्य कारणांमुळे परीक्षा देवू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता आणि दि. १७ नोव्हेंबर, २०२० पर्यंत गुगल फार्ममध्ये माहिती सादर करण्याचे कळविल्यानंतर चारशेच्यावर विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. या परीक्षेसाठी १४६ विषय असून २७ अभ्यासक्रम आहेत. पन्नास परीक्षा केंद्रावर ऑनलाईन वा ऑफलाईन पद्धतीने परीक्षा होणार असून परीक्षेसाठी विद्यापीठाकडून एम.सी.क्यु. पॅटर्नप्रमाणे पेपर संबंधित परीक्षा केंद्रांवर उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. परीक्षा वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येणार असून नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये ही परीक्षा घेण्यात येणार आहे.

तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी व अधिक माहितीकरीता सहा. कुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील (९७६३८३३९६९) व सहा. कुलसचिव श्री दिपक वानखडे (९४२०१२८६८४) यांचेशी संपर्क साधावा, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २०/११/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी